स. क्रि.केस नं. ८०५/२०२३

अमृत जगताप वि. राहूल शिंदे

**निशाण नं. ३१/क**

**<u>फिर्यादीतर्फे साक्षीदार क्र. १ यांची जबानी.</u>**

मी याद्वारे प्रतिज्ञापूर्वक कथन करतो की,

माझे नांव - आनंदराव पांडुरंग कांबळे

वय - २९ वर्षे

धंदा - नोकरी

राहणार - माले ता. पन्हाळा, जि. कोल्हापूर

<u>सरतपास फिर्यादीतर्फे वकील श्री. व्ही.ए. पाटील यांचेतर्फे</u>

१. मी फिर्यादी अमृत जगताप व आरोपी राहूल शिंदे यांनी मित्र असल्यामुळे ओळखतो. आरोपी राहूल शिंदे यांचा पोल्ट्री व्यवसाय होता. त्यांचा व्यवसाय बंद पडला होता तो पुन्हा सुरु करण्याच्या उद्देशाने त्यांनी आमच्याकडे मदत मागितली. आमच्या दोघांकडून त्यांनी रक्कम रु. ३ लाख ची मदत मागितली होती. मी त्यांना रक्कम रु. ५०,००० दिली. फिर्यादी अमृत जगताप यांनी २ लाख ५० हजार रुपये आरोपीस दिले. याबाबत आम्ही आरोपीसोबत दि. २५.०१.२०२३ रोजी शाहूवाडी येथे नोटराईज कागद केले. सदरची रक्कम आरोपीने आम्हांला एक महिन्यानंतर देतो असे सांगितले होते. नोटराईज कागद करतेवेळी तेथे मी, अमृत, धनंजय पाटील, संतोष जगताप व आरोपी राहूल हे उपस्थित होते. आता मला नि. २१ वरील कागद प्रकरण दाखवण्यात आले. त्यावर माझा अंगठा, फोटो व सही आहे. तसेच त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे व यावर फिर्यादी व इतर साक्षीदारांच्या सह्या आहेत. मला आरोपीने रक्कमेची परतफेड केली नाही. तसेच आरोपीने अमृत यासदेखील पैशांची परतफेड केली नाही. परतफेडीकरिता आरोपीने फिर्यादीस चेक दिला होता व तो चेक वटला नाही म्हणून प्रस्तुत फिर्याद फिर्यादीने आरोपीविरुद्ध दाखल केली आहे. माझ्यासमोर फिर्यादीने आरोपी यास रक्कम दिली होती.

सरतपास पूर्ण

उलटतपास आरोपीतर्फे श्री. एम. एस. शेटके वकिल यांच्यामार्फत सुरु

२. माझे शिक्षण आय. टी. आय. पर्यंत झाले आहे. मी समाजकल्याण शाळेमध्ये कॉन्ट्रॅक्ट बेसिसवर पहारेकरी या पदावर काम करतो. मला दर महिन्याला १४,००० रुपये पगार मिळतो. हे म्हणणे खरे आहे की, आज कोर्टात साक्षीला येण्याकरिता वैयक्तिकरित्या मला नोटीस आली नाही. हे म्हणणे खरे आहे की मला तारखेबाबतची कल्पना अमृत यांनी दिली होती. फिर्यादी व आरोपी हे माझे ७-८ वर्षांपासून मित्र आहेत. हे म्हणणे खरे आहे की अमृत जगताप यास आरोपी हे माझे मित्र आहेत अशी मी ओळख करुन दिली होती. हे म्हणणे खरे आहे की राहूल यांची ओळख वैयक्तिकरित्या अमृत जगताप यांच्याशी नव्हती. आरोपी यांचा व्यवसाय साधारणतः २०१८ पासून सुरु होता. पोल्ट्री व्यवसाय कोणाच्या नावे होता याची मी चौकशी केली नाही. हे म्हणणे खरे नाही की पोल्ट्री व्यवसाय हा आरोपीच्या आईच्या नावे होता. हे म्हणणे खरे नाही की आरोपी हा पूर्वीपासून पी. आर. ओ. म्हणून काम करत होता.

३. आम्ही आरोपी यास रोख कॅश स्वरुपात रक्कम दिली होती. आम्ही कराराच्या तारखेदिवशी आरोपी यास रक्कम दिली होती. मी करारपत्र पूर्ण वाचले होते व त्यातील मजकूर मला माहिती आहे. रक्कम रु. ५०,००० ही मी आरोपीस एकरकमी दिलेली आहे. धनंजय पाटील व संतोष जगताप हे माझे मित्र आहेत. हे म्हणणे खरे नाही की त्या दोघांची आरोपीशी ओळख नाही. संतोष जगताप हे फिर्यादीच्या भावकीतील आहेत.

४. हे म्हणणे खरे नाही की आरोपीची परिस्थिती चांगली होती व त्यामुळे त्याने आमच्याकडे पैशांची मागणी केली नाही. मी आरोपीविरुद्ध ५०,००० रुपयांच्या बाबतीत कोणतीही कार्यवाही केलेली नाही. हे म्हणणे खरे नाही की आरोपीने रक्कम घेतलेली नसल्यामुळे मी त्याच्याविरुद्ध कार्यवाही केलेली नाही. हे म्हणणे खरे आहे की तशी कार्यवाही करायला मला कोणतीही अडचण नव्हती. सदरचे करारपत्र हे कोणी

लिहीले याबाबत मला माहिती नाही. साक्षीदार स्वतःहून सांगतो की शाहूवाडी कोर्टात टायपिंग करणारे होते त्यांनी आम्ही सांगितल्याप्रमाणे लिहीले. हे म्हणणे खरे नाही की आरोपीने वादातीत करारपत्र आमच्यासोबत केलेले नाही. हे म्हणणे खरे नाही की आरोपी यांने आमच्याकडून कोणतीही रक्कम स्विकारलेली नाही.

५. हे म्हणणे खरे नाही की आरोपीच्या खोट्या सह्या करुन फिर्यादी व मी यांनी मिळून हे बनावट करारपत्र तयार केले. हे म्हणणे खरे नाही की फिर्यादी हे माझे मित्र आहेत म्हणून मी आजरोजी मी खोटी साक्ष देत आहे. हे म्हणणे खरे नाही की आरोपीने कोणतीही रक्कम स्विकारलेली नसल्यामुळे तो आम्हांला कोणतेही देणे लागत नाही.

**उलटतपास पूर्ण.**

**फेरतपास नाही.**

श्रवणोत्तर स्विकृत,

सही/-

**(के.दि.काकतकर)**

दिनांक - ०५.०२.२०२५ **प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी,पन्हाळा**